प्रेस नोट दिनांक १३/०७/२०२४

**मोटार सायकल चोरीचे ०४ व मोबाईल फोन चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस**
**शहर गुन्हे शाखेची कामगिरी.**

---

**अ) गुन्हे शाखेकडील स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे तपास पथक** हे, सोलापूर शहर परिसरात, मोटार सायकल चोरीचे गुन्हेगारांचा शोध घेत असताना, त्यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शांतीनगर येथील, इसम नामे- आसीफ शेख याचेकडे ०२ नंबर प्लेट नसलेल्या मोटार सायकली असुन, त्या चोरीच्या आहेत. त्याप्रमाणे, स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे तपास पथकाने, मिळालेल्या बातमी प्रमाणे, इसम नामे- **आसीफ अशफाक शेख, वय-३५ वर्षे, रा. घरनं-२० अशोक कामगार सोसायटी, शांती नगर, नई जिंदगी सोलापूर** , यास दि.०६/०७/२०२४ रोजी ताब्यात घेतले.

त्यानंतर, इसम नामे- आसीफ अशफाक शेख यांचेकडे स.पो.नि. संदिप पाटील व त्यांचे तपास पथकाने, कौशल्यपुर्वक तपास केला असता, त्याने, चोरीच्या मोटार सायकली विकत घेतल्याचे कबुल केले. त्याप्रमाणे, त्याचेकडून नमूद मोटार सायकली जप्त करून, खालील नमूद गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरनं / कलम | मो. सायकल क्रमांक | किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | जेलरोड पोलीस ठाणे | गुरनं-२९३/२०२४ भादंवि-३७९ | MH-13 CE-2391 | रू.40,000/- |
| २ | नळदुर्ग पोलीस ठाणे | गुरनं-५०/२०२४ भादंवि-३७९ | MH-25 AR-4628 | रू.60,000/- |
| | | | **एकूण** | **रू.१,००,०००/-** |

**ब)-१ :- दिनांक ०१/०७/२०२४ रोजी सपोनि/महाडिक व त्यांचे तपास पथक** यांना गुप्तबातमीदाराने माहिती दिली की, "एक इसम चोरी केलेला मोबाईल घेवुन, कुमार करजगी कॉम्पलेक्स समोरील मोकळे मैदानात, मुरारजी पेठ, सोलापुर याठिकाणी उभा आहे." त्यामुळे, प्राप्त बातमीचे आधारे, आरोपी नामे- कृष्णा विलास जगदाळे, वय ३४, रा. डोणगाव, मराठी शाळेच्या समोर, सोलापुर यास ताब्यात घेवून, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात **एक वीवो कंपनीचा १५,०००/- रूपये किंमतीचा मोबाईल** मिळुन आला. त्याबाबत, अभिलेख तपासणी केली असता, सदरचा मोबाईल हा, **फौजदार चावडी पोलीस ठाणे गु.र.क्र. ३९७/२०२४ भादविक ३७९** या दाखल गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**ब)-२:- तसेच विजापुर नाका पोलीस ठाणे गु.र.क्र २०१/२०२४ भादविक ३७९** या दाखल गुन्ह्यातील चोरीस गेलेला **१०,०००/- रु. किंमतीचा एक काळया रंगाचा रेडमी कंपनीचा** मोबाईल याचा शोध, तांत्रिक माहितीचे आधारे घेतला असता, तो मोबाईल फोन इसम नामे- रविकुमार महादेवप्पा संतम, वय ३८, रा. मु.पो. गोला, ता.शहाबाद, जि. कलबुर्गी, राज्य कर्नाटक याचे ताब्यात मिळाल्याने, तो **मोबाईल** त्याचेकडून जप्त करून, सदरचा गुन्हा उघडकीस आला आहे.

**ब)-३ :-** तसेच, **एम आय डी सी पोलीस ठाणे गु.र.क्र ४६०/२०२४ भादविक ३७९** अन्वये दाखल गुन्ह्यातील चोरीस गेलेले **३०,०००/- रु. किं.ची एक काळया रंगाची ॲक्टीव्हा मोटार सायकल** चा शोध घेत असताना, सदरची मोटार सायकल ही, फिर्यादी यांचे घराचे काही अंतरावर पार्क असलेली दिसुन आली. त्यामुळे, सदरची मोटार सायकल ही, त्याठिकाणी कशी आली, याचा शोध घेतला असता, यातील फिर्यादी व त्यांचा मित्र अशा दोघांचे मोटार सायकली या एक सारख्याच आहेत. त्यामुळे, यातील फिर्यादीचे मित्राने, नजरचूकीने सदरची मोटार सायकल घेवून गेल्याचे निष्पन्न झाले असल्याने, सदरची मोटार सायकल ही जप्त करून, गुन्हा उघडकीस आणला आहे.

**क) दिनांक ०५/०७/२०२४ रोजी, पोउपनि-अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकास** गोपनिय बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीप्रमाणे, आरोपी नामे - **(१) करण संतोष जाधव,** वय १९ वर्षे, सध्या रा. येमाई मंदीर रोड, नागोबा मंदीराचे बाजुला, मार्डी, ता.उत्तर सोलापूर, कायम रा. सुभाषवाडी, शास्त्री नगर, अंबरनाथ, मुंबई, **(२) महिबुब सादिक शेख,** वय १९ वर्षे, रा.गैबीपीर नगर, रामवाडी, सोलापूर यांना, जुना तुळजापूर नाका येथील शेळगीकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवर, सोलापूर येथे सापळा रचुन, ताब्यात घेतले. नमूद इसमांकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता, त्यांनी **एम.आय.डी.सी.पोलीस ठाणे, सोलापूर शहर गु.र.नं. ३१०/२०२४ भादंवि ३७९ अन्वये, दाखल गुन्हयातील, २५,०००/- रू.किंमतीची स्पलेंडर प्लस मोटार सायकल**

Scanned with CamScanner

क्रमांक MH-13-BF-8512 चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने, ती मोटार सायकल त्यांचेकडून जप्त केली आहे. त्यामुळे, वरील प्रमाणे गुन्हा उघडकीस आला आहे.

**अशा प्रकारे, शहर गुन्हे शाखेने, मोटार सायकल चोरीचे ०४ आणि मोबाईल फोन चोरीचे ०२ असे ०६ गुन्हे उघडकीस आणून, एकूण १,८०,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत आला आहे.**

सदरची कामगीरी, मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री. राजन माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. संदिप पाटील, स.पो.नि.श्रीनाथ महाडिक, पो.उप.नि.अल्फाज शेख व त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

1/3/7

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**करीता.**

Scanned with CamScanner